आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२४ एप्रिल २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संसदेत सर्वपक्षीय बैठक सुरू, हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा इशारा
- हल्ल्याशी संबंध असलेल्या लष्कर ए तैयबा तिघांची माहिती देणाऱ्यांना ६० लाखांचं बक्षीस जाहीर
- पोलाद उद्योगातली आयात शून्यावर आणून निर्यातीवर लक्ष केंद्रीत करण्याचं प्रधानमंत्र्यांचं उद्योजकांना आवाहन
- FIITJEE च्या कोचिंग सेंटरवर ईडीचे छापे

**आणि**

- ५ टक्के विकासदर गाठल्याबद्दल जागतिक बँकेकडून श्रीलंकेचं कौतुक

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं बोलावलेली सर्वपक्षीय बैठक नवी दिल्लीत संसद भवन संकुलात सुरू आहे. बैठकीच्या सुरुवातीला २ मिनिटे मौन पाळून मृतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह बैठकीच्या अध्यक्षस्थानी असून, गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर, अर्थमंत्री निर्मला सीतारमण, भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा, काँग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, द्रमुकचे तिरुची शिवा, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रफुल्ल पटेल, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, समाजवादी पार्टीचे राम गोपाल यादव, आम आदमी पक्षाचे संजय सिंह, राष्ट्रीय जनता दलाचे प्रेमचंद गुप्ता, वायएसआर काँग्रेसचे पी. व्ही. मिधुन रेड्डी, तृणमूल काँग्रेसचे सुदीप बंदोपाध्याय इत्यादी नेते या बैठकीला उपस्थित आहेत.

**<><><><><>**

दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर श्रीनगरमध्येही आज राज्य सरकारनं आयोजित केलेली सर्वपक्षीय बैठक झाली. या बैठकीत हल्ल्याचा एकमुखी निषेध करण्यात आला आणि सरकारच्या सर्व प्रयत्नांना पाठिंबा देण्यावर एकमत झालं. इतर राज्यात राहणाऱ्या काश्मिरी नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना कुठलाही त्रास होऊ नये यासाठी काळजी घेण्याचं आवाहन या बैठकीत करण्यात आलं. नॅशनल कॉन्फरन्, भाजपा, काँग्रेस, माकप, पीडीपी, पीपल्स कॉन्फरन्स, अवामी इत्तेहाद पार्टीसह इतर पक्षांचे नेते या बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि परराष्ट्रव्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती भवनात जाऊन भेट घेतली. जयशंकर यांनी निवडक देशांच्या राजदूतांशी देखील आज या संदर्भात चर्चा केली. जर्मनी, जपान, पोलंड, युके आणि रशिया या देशांचे राजदूत यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना असतील तिथून शोधून काढून, त्यांनी कल्पना केली नसेल अशी शिक्षा करू, असा निर्धार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. ते आज बिहारमधे मधुबनी इथं राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त आयोजित जाहीर सभेत बोलत होते.

**होल्ड - प्रधानमंत्री...**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला, या दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्यांना प्रधानमंत्र्यांनी काही क्षण मौन पाळून आदरांजली वाहिली. दहशतवादाचे बळी ठरलेल्यांना न्याय मिळावा यासाठी आवश्यक तो प्रयत्न केला जाईल. संपूर्ण देश या निर्धारामागं एकदिलानं ठामपणे उभा आहे. मानवतेवर विश्वास असणारे सर्वजण आपल्यासोबत आहेत, असं प्रधानमंत्री म्हणाले.

या वेळी मोदी यांनी १३ हजार ५०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण केलं. यात जयनगर ते पाटणा दरम्यान धावणाऱ्या नमो भारत रॅपिड रेल्वे, आणि सहरसा ते मुंबईत लोकमान्य टिळक टर्मिनस पर्यंत धावणाऱ्या अमृत भारत एक्सप्रेसचा समावेश आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या १५ लाख नव्या लाभार्थ्यांना प्रधानमंत्र्यांच्या हस्ते स्वीकृती पत्रं प्रदान करण्यात आली. या योजनेच्या १० लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ताही त्यांनी जारी केला.

<><><><>

पहलगाम दहशतवादी हल्ल्याशी संबंध असलेल्या लष्कर ए तैयबाच्या तीन दहशदवाद्यांची माहिती देणाऱ्यांना एकूण ६० लाख रुपयांचं बक्षीस पोलिसांनी जाहीर केलं आहे. या दहशतवाद्यांवर प्रत्येकी वीस लाखांचं इनाम पोलिसानी ठेवलं आहे. या दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानी नागरिक असलेले हाशीम मुसा, अली भाई यांच्यासह जम्मू काश्मीरमधल्या अनंतनाग जिल्ह्यातला हुसेन ठोकर यांचा सहभाग असल्याचं उघड झालं आहे.  पोलिसांनी तिन्ही संशयित हल्लेखोरांची रेखाचित्रं जारी केली आहेत.

<><><><>

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर अटारी वाघा बॉर्डरवरचे दरवाजे बंद करण्यात आले आहेत. दररोजचा रिट्रीट समारंभ, तसंच संध्याकाळी राष्ट्रध्वज उतरवल्यानंतरचं पारंपरिक हस्तांदोलनही आज झालं नाही. हा सोहळा पाहण्यासाठी नेहमीप्रमाणे पर्यटक जमले होते, त्यांनी पहलगाम हल्ल्याचा निषेध केला आणि त्याला जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

<><><><>

पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानी नागरिकांसाठी व्हिसा सेवा बंद करण्याचा निर्णय भारतानं घेतला आहे. ज्या पाकिस्तानी

नागरिकांना व्हिसा दिलेला आहे त्यांचा व्हिसा २७ एप्रिलला रद्द केला जाईल. तसंच वैद्यकीय व्हिसा देखील २९ एप्रिलला रद्द होईल.

**<><><><><>**

श्रीनगरहून सव्वा तीनशे पर्यटक घेऊन येणारी २ विमानं आज रात्री मुंबई विमानतळावर पोहोचणार आहेत. या नागरिकांना एसटी महामंडळाच्या बसमार्फत त्यांच्या गावी पोहोचवलं जाणार आहे. त्यांच्यासाठी ८ शिवनेरी बस तैनात केल्याची माहिती महामंडळानं दिली आहे.

**<><><><><>**

भारतातल्या पोलाद उद्योगात शून्य आयात करून फक्त निर्यातीवर लक्ष केंद्रित करण्याची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केली. मुंबईत बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये आज आयोजित करण्यात आलेल्या इंडिया स्टील २०२५च्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचं उद्घाटन दूरस्थ पद्धतीनं केल्यानंतर ते बोलत होते. राष्ट्रीय पोलाद धोरणांतर्गत निर्धारित केलेल्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांवर त्यांनी यावेळी प्रकाश टाकला. २०३० पर्यंत देशातलं पोलाद उत्पादन ३० कोटी टनांपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट असल्यांच त्यांनी सांगितलं…

**होल्ड… बाईट - नरेंद्र मोदी**

भारत सध्या अडीच कोटी टन पोलाद निर्यात करण्याचं उद्दिष्ट ठेवून काम करत असून २०४७ पर्यंत पोलाद उत्पादन क्षमता ५० कोटी टनांपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट असल्याचंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रीय पंचायतराज दिनानिमित्त उत्कृष्ट कामगिरीबद्दल गोंदिया जिल्ह्यातल्या डव्वा ग्रामपंचायतीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज हवामान कृषी पंचायत पुरस्कार प्रदान करण्यात आला. बिहारमध्ये मधुबनी इथे पंचायती राज मंत्रालयाकडून हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. हा पुरस्कार

सरपंच योगेश्वरी चौधरी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. मानचिन्ह, १ कोटी रुपये रोख आणि प्रमाणपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

**<><><><><>**

जेईई या प्रवेशपरिक्षेसाठी तयारी करुन घेणाऱ्या FIITJEE या शिकवणी वर्गाच्या दिल्ली, नोएडा आणि गुरगाव इथल्या केंद्रावर आज ईडी म्हणजे अंमलबजावणी संचालनालयाने धाड टाकली. देशभरात मिळून 73 केंद्र असणाऱ्या या संस्थेने गाझियाबाद आणि नोएडा इथली केंद्रं जानेवारीत अचानक बंद केली. त्यामुळे आयआयटीच्या प्रवेशपरिक्षेच्या तयारीसाठी फी भरलेल्या पालकांनी या संस्थेविरुद्ध अनेक तक्रारी नोंदवल्या होत्या.

**<><><><><>**

छत्तीसगढ आणि तेलंगणाच्या सीमाभागात सुरक्षादलांबरोबरच्या चकमकीत आज ३ माओवादी अतिरेकी ठार झाले. बिजापूर जिल्ह्यातल्या कारेगुट्टा टेकड्यांच्या परिसरात माओवादी संघटनांचे म्होरके लपून बसले असल्याची खबर मिळाल्यावरुन संयुक्त शोध अभियान गेले २ दिवस सुरु आहे. छत्तीसगढ, तेलंगण आणि महाराष्ट्राच्या सुरक्षा दलांचं संयुक्त पथक ही
मोहीम राबवत आहे.

**<><><><><>**

भारतीय नौदलाच्या आयएनएस सुरत या क्षेपणास्त्र विनाशकानं आज समुद्रातील लक्ष्याचा अचूक वेध घेण्यात यश मिळवलं. यामुळे भारताच्या संरक्षण सामर्थ्यात भर पडल्याचं नौदलानं समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे म्हटलं आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेने उद्योग आणि पर्यटन क्षेत्रात चांगली कामगिरी केल्यामुळे ५ टक्के विकासदर गाठला आहे, असं सांगत जागतिक बँकेनं श्रीलंकेच्या आर्थिक

कामगिरीचं कौतुक केलं आहे. श्रीलकेनं रचनात्मक सुधारणा आणि कठोर धोरणांची अंमलबजावणी करत देशाची अर्थव्यवस्था रुळावर आणली असं जागतिक बँकेनं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**